REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 1 | OCTOBER– 2017




# मानवी अधिकार आणि कौटुंबिक हिंसाचारा पासून महिलांचे संरक्षण अधिनियम कायदा २००५

**प्रा. सौ. प्रज्ञा संदीप नंदेश्वर**
**रा .तू .म .नागपूर विद्यापीठ नागपूर ,द्वारा संचालित ,**
**श्री चक्रपाणी कला महाविद्यालय, नागपूर.**

प्रस्तावना :-

भारतीय समाजात स्त्रीचे स्थान वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या स्वरूपाचे राहिले आहे. परंतु पितृसत्ताक पद्धतींच्या प्राबल्य मुळें बहुतांश काळात स्त्रीचे अवस्था दुय्यमत्वाची होती. तिच्यावर अनेक प्रकारांनी अन्याय होत होते. आजच्या काळाचा विचार करता या स्थितीत फार फरक पडला आहे असे नाही. आजही स्त्रीला अनेक प्रकारच्या अत्याचारांना तोंड द्यावे लागते. स्त्रियांचा कौटुंबिक दर्जा हा धर्मानेच दुय्यम ठरविलेला असल्यामुळे भारतीय मानसिकता स्त्रियांकडे त्याच दृष्टिकोनातून पाहताना आपल्याला दिसून येते. त्यामुळेच ज्या कुटुंबात अथवा घरात ति स्वतःला सुरक्षित समजते त्याच तिच्या घरात ती कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडते. भारतीय संविधानाने कोणताही भेदभाव न करता सर्व भारतीय नागरिकांना समता, स्वातंत्र व न्यायाची हमी दिलेली आहे. असे असले तरीही जोपर्यंत पितृसत्ताक मानसिकता बदल होत नाही तोपर्यंत स्त्रियांच्या सामाजिक आर्थिक व कौटुंबिक स्थितीत परिवर्तन होणार नाही हे आजही आपल्याला म्हणावे लागते.

खरेतर स्त्रियांवर होणाऱ्या निरनिराळया अत्याचारापासून व कौटुंबिक हिंसाचारापासून तिला संरक्षण व हक्क प्राप्त करून देण्यासाठी भारतात आजपर्यंत अनेक कायदे अस्तित्वात आहेत ते पुढील प्रमाणे

1)भारतीय दंड विधान कायदा 1860
2) हुंडा प्रतिबंधक कायदा 1961
3) सतीप्रथा विरोधक कायदा 1987
4) घटस्फोट कायदा 1869
5)कौटुंबिक न्यायालय कायदा 1984
6) मुस्लीम महिलांसाठी कायदा 1986
7) गर्भलिंग परीक्षण व गर्भपात विषयक कायदा

वरील प्रकारच्या निरनिराळ्या कायद्याअंतर्गत स्त्रियांना मिळणाऱ्या हक्क किंवा संरक्षण आणखीन प्रभावीपणे लागू होण्यासाठी तसेच कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने संसदेने 2005 मध्ये “कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा 2005” हा अधिनियम मंजूर केला व ऑक्टोबर 2006 पासून तसा कायदा संपूर्ण देशभर (जम्मू-काश्मीर वगळता) देशातील सर्व राज्यांना लागू झाला. या कायद्यामुळे महिलांना कौटुंबिक

VOLUME - 7 | ISSUE - 1 | OCTOBER – 2017

हिंसाचारापासून संरक्षण देण्यात आले. कौटुंबिक हिंसा ही घरात घडते, ज्याला आपण आपल्या सर्वांचे सर्वात सुरक्षित स्थळ समजतो. घरच्या चार भिंतीआड होणारा हिंसाचार आजवर उपेक्षिलाच होता. ज्या महिला कौटुंबिक अत्याचाराला बळी पडल्या आहेत त्यांना त्यांच्या अधिकारांचा वापर अधिक सहज शक्य होण्यासाठी व त्यांना लवकरात लवकर न्याय मिळवून देण्यासाठी हा कायदा तयार करण्यात आला आहे. हिंसाचार मुक्तजीवन हा स्त्रियांचा मानवी हक्क आहे, म्हणूनच कौटुंबिक हिंसाचार हा नि:संशयपने तिच्या मानवी अधिकाराचा विषय आहे. तसेच तिच्या सर्वांगीण विकासाला अडथळा निर्माण करणारा गंभीर दखल पात्र विषय आहे. म्हणूनच अस्तित्वात असलेले बहुतेक स्त्रीविषयक कायदे व तरतुदी एकाच चौकटीत सामावून घेणारा कायदा म्हणजे "कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा 2005".

या कायद्याअंतर्गत कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या प्रकरण-2 कलम 3 नुसार खूप विस्ताराने दिली गेली आहे. या अधिनियमानुसार ज्या व्यक्तीने अन्याय केला आहे वा जो व्यक्ती प्रताडीत करीत आहे त्याचे कोणतेही कृत्य, अकृती किंवा कृती किंवा आचरण ज्यामुळे, पिडीत व्यक्तीचे आरोग्य, जीवित, अवयव किंवा मानसिक व शारीरिक स्वास्थ्य यांना हानी किंवा क्षति किंवा धोका पोहोचत असेल किंवा तसे करण्याकडे त्याचा कल असेल आणि त्यामध्ये शारीरिक दुर्व्यवहार, लैंगिक दुर्व्यवहार, शाब्दिक व भावनिक दुर्व्यवहार आणि आर्थिक दुर्व्यवहार घडवून आणणाऱ्या समावेश होत असेल किंवा कोणताही हुंडा किंवा इतर मालमत्ता किंवा किमती दस्तावेज यांच्या कोणत्याही बेकायदेशीर मागणीचे पूर्तता करण्यासाठी पीडित व्यक्तींवर किंवा तिच्याशी संबंधित इतर कोणत्याही व्यक्तीवर जबरदस्ती करण्याच्या दृष्टीने पीडित व्यक्तीचा छळ, हानी होत असेल, तिला क्षति किंवा धोका पोहोचत असेल किंवा ज्याचे पर्यवसान वर उल्लेखित कोणत्याही आचारानाद्वारे पीडित व्यक्तीस किंवा तिच्याशी संबंधित कोणत्याही व्यक्तीस धमकावन्या मध्ये होत असेल किंवा पीडित व्यक्तीस अयन्य प्रकारे शारीरिक किंवा मानसिक अशा कोणत्याही प्रकारची क्षति किंवा हानी पोहोचत असेल तर ते आचरण कौटुंबिक हिंसाचार ठरेल.

तसेच या प्रकरणांमध्ये शारीरिक दुर्व्यवहार, लैंगिक दुर्व्यवहार, शाब्दिक व भावनिक दुर्व्यवहार, आर्थिक दुर्व्यवहार या शब्दांची सुद्धा व्याख्या केलेली आहे वा स्पष्टीकरण दिलेले आहे.

**या कलमाच्या प्रयोजनार्थ:-**

**१) शारीरिक दुर्व्यवहार** याचा अर्थ पीडित व्यक्तीस शारीरिक यातना, हानी पोहोचविण्यास किंवा जीवित, अवयव किंवा आरोग्य यांना धोका पोहोचविण्यास किंवा आरोग्य किंवा विकास यांना हानी पोहोचविन्यास कारणीभूत ठरेल अशा स्वरूचे कोणतेही कृत्य किंवा आचरण असा आहे आणि त्यामध्ये हमला, अपराधिक धाकदपटशा किंवा अपराधिक बळजबरी यांचा समावेश होतो.

**२) दोन लैंगिक दुर्व्यवहार :-** यामध्ये ज्यामुळे स्त्रीच्या प्रतिष्ठेचा अवमान होतो, अवहेलना होते किंवा कमीपणा येतो वा अन्य प्रकारे तिचा मनोभंग होतो असे लैंगिक स्वरूपाचे कोणतेही आचरण याचा समावेश होतो.

३) शाब्दिक आणि भावनिक दुर्व्यवहारः- यामध्ये अवमान, कुचेष्टा, अवहेलना, अपशब्द वापरणे आणि विशेषतः मुल होत नसल्याचाया किवा मुलगा नाल्याच्या कारणावरून अपमान किवा कुचेष्टा करणे आणि पिडीत व्यक्तीचे हितसंबंध असलेच्या एखाद्या व्यक्तीस, शारीरिक पिडा पोहोचविण्याची वारंवार धमकी देणे याचा समावेश होतो.

४) आर्थिक दुर्व्यवहारः- यामध्ये पिडीत व्यक्ती कोणत्याही कायद्यान्वये किंवा रूढी नुसार ज्यास हक्कदार असेल अशा, मत्ती न्यायालयाच्या आदेश नुसार किंवा अन्यथा देय असो किंवा कसे किंवा पीडीत व्यक्तीस गरजेपोटी तासेच पिडीत व्यक्ती व

असल्यास तिची मुले यांचा घरघुती गरजांसाठी, परंतु त्या गर्जन्पुर्तीच मर्यादित नव्हे तर आवश्यक असेल अशी सर्व किंवा कोणतीही आर्थिक किंवा वित्तीय साधन संपत्ती, स्त्रीधन, पिडीत व्यक्तीची संयुक्तपणे किंवा स्वतंत्रपने मालकी असणारी मालमता, सामाईक घरांच्या संबंधातील भाड्याचे प्रदान आणि निर्वाह खर्च यापासून वंचित करणे म्हणजे आर्थिक दुर्व्यवहार होये तसेच, घर संसारातील चीजवस्तुंची विल्हेवाट, स्थावर किंवा जंगम मत्ता, मौल्यवान चीज वस्तू, शेअर्स, रोखे, बंध पत्रे व अन्य तत्सम बाबी किंवा पीडित व्यक्तीचा ज्यामध्ये हितसंबंध आहे किंवा कौटुंबिक नातेसंबंधांमुळे ज्याचा वापर करण्यास तो हक्कदार आहे किंवा पीडित व्यक्तीला किंवा तिच्या मुलांना ज्याची वाजवी गरज आहे अशी अन्य मालमत्ता किंवा तिचे स्त्रीधन किंवा पीडित व्यक्तीने संयुक्तपने वा स्वतंत्रपणे धारण केलेली अन्य कोणतीही मालमत्ता यांचे कोणतेही अन्य संक्रमण करणे आणि पीडित व्यक्ती कौटुंबिक नातेसंबंधामुळे ज्यांचा वापर करण्यास किंवा लाभ घेण्यास हक्कदार आहे अशी साधनसंपत्ती किंवा सुविधा, तसेच सामाईक घरातील प्रवेशाचा हक्क कायम उपलब्ध असण्यास मनाई करणे किंवा निर्बंध घालणे म्हणजेच आर्थिक दुर्व्यवहार होय असे या प्रकरणात नमूद करण्यात आले आहे.

तसेच स्पष्टीकरण दोन मध्ये-प्रताडीत करणाऱ्या व्यक्तीचे कोणतेही कृत्य, अकृती, कृती किंवा आचरण हे या कलमान्वये “कौटुंबिक हिंसाचार” या सदरात मोडते किंवा कसे हे निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी या बाबीतील एकूण वस्तुस्थिती आणि परिस्थिती विचारात घेतली जाईल.

अशा भाषेत “कौटुंबिक हिंसाचार कायदा 2005” या अधिनियमातील दुसऱ्या प्रकरणात कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या केली आहे. तसेच या कायद्याअंतर्गत जि पिडीत स्त्री आहे त्या स्त्रीची व्याख्या खूप विस्तारित स्वरूपात मांडली आहे या अंतर्गत लग्न झालेली स्त्री तर येतेच शिवाय अशा सर्व स्त्रिया ज्या कौटुंबिक संबंधात राहत आहेत किंवा कुणावर अवलंबून राहात आहेत याशिवाय पिडीतान मध्ये कुठलाही मनुष्य स्त्री असो वा पुरुष, लहान मुले, आई-वडील, नोकर मंडळी किंवा कौटुंबिक संबंधात राहणारे कुणीही या कायद्याचा आश्रय घेऊ शकतात तसेच विशेष बाब ही आहे की “घरगुती हिंसाचार प्रतिबंध कायदा 2005” पूर्व लक्षी प्रभावाने लागू होतो त्यामुळे 2005 पूर्वीचे खटलेही या कायद्याच्या कक्षेत येतात.

अशा प्रकारे स्त्रियांचा सामाजिक व कौटुंबिक दर्जा उंचावण्यासाठी व तिच्यावर होणाऱ्या कौटुंबिक अन्यायाचे निर्मूलन करण्यासाठी “कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा 2005” हा अत्यंत प्रभावी असलेला आपणास दिसून येतो.

संदर्भ ग्रंथ :-

१) महाराष्ट्र शासन ,महिला व बाल विकास आयुक्तालय ,कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ –माहिती पुस्तिका .

२) कौटुंबिक हिंसाचारापासून महिलां संरक्षण कायदा २००५ ,विधिलिखित ,महाराष्ट्र राज्य महिला आयोग ,मुंबई

३) घरगुती हिंसाचार कायद्यातील छळ, adv.जाई वैद्य ,महाराष्ट्र टाईम्स ,ऑगस्ट २ ,२०२०